ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादी विषयांस वाहिलेले प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारी प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५९६१

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Regd. No. B. 3434. Licence No. 33

वर्ष ३१ | पुणे, बुधवार १५ सप्टेंबर, १९६५ | अंक १८

## विविध माहिती

**सेवानिवृत्तीचे वय ५८ च**—मध्यवर्ती सरकारच्या गृहखात्याच्या एका प्रवक्त्याने अशी माहिती दिली आहे की, सरकारी नोकरांच्या सेवानिवृत्तीचे वय ५८ पेक्षा अधिक करण्याचा विचार सरकारपुढे नाही. सध्याच्या नियमाप्रमाणे ५८ वर्षे पूर्ण झाल्यावर मध्यवर्ती सरकारच्या नोकरांना निवृत्त व्हावे लागते. त्यानंतर नोकरी चालू ठेवण्याचा निर्णय क्वचितच आणि तोही अपवादात्मक परिस्थितीतच घेण्यात यावा, अशी सरकारची भूमिका आहे.

**कागदाचा कारखाना रद्द**—४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमातील नव्या प्रकल्पांची फेरतपासणी केल्यावर नियोजन समितीने सार्वजनिक क्षेत्रात काढण्यात यावयाच्या वृत्तपत्रांच्या कागदाच्या कारखान्याचा एक संकल्प रद्द केला आहे. ह्या कारखान्यासाठी ९ कोटी रुपये खर्च येणार होता. त्यातील ६ कोटी रुपये परदेशीय चलनाच्या रूपात लागणार होते. संकल्पित कारखान्याची वार्षिक उत्पादनक्षमता ३० हजार टनांची होती.

**दाक्षिणात्य संगीतज्ञ अमेरिकेत जाणार**—दक्षिण भारतामधील दोन प्रसिद्ध संगीतकलानिपुण अमेरिकेतील एका विद्यापीठात दक्षिणेकडील संगीताचे शिक्षण देण्यासाठी जाणार आहेत. त्यांपैकी एक गायक असून दुसरा मृदंगपटू आहे. विद्यापीठाने चालविलेल्या एका कॉलेजातील संगीतशाखेत ते पारंपरिक रागांचे व तालांचे अध्यापन करतील. अमेरिकेत काही सार्वजनिक जलसेही ते करणार आहेत.

**म्हैसूरमधील विजेचे दर वाढणार !**—म्हैसूर राज्यातील विजेचे दर वाढण्याचा संभव असल्याचे राज्याच्या वीज मंडळाच्या अध्यक्षांनी ध्वनित केले आहे. म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संघटनेपुढे बोलतांना ते म्हणाले की, अलीकडे वीज-उत्पादनाच्या खर्चात खूपच वाढ झालेली आहे. त्यामुळे म्हैसूर राज्याच्या वीजमंडळाला दरसाल सुमारे १९ लाख रुपयांचा तोटा सहन करावा लागत आहे.

**जंगलातील युद्धाला शाकाहार चांगला**—व्हिएटनाममधील युद्धात ऑस्ट्रेलिआतील काही सैनिक आहेत. आहारात मांसाचा पुरवठा नसल्याबद्दल ते कुरकूर करीत आहेत. पण ऑस्ट्रेलिआच्या एका माजी मंत्र्याच्या मताने जंगलव्याप्त प्रदेशांतील युद्धात मांसाहारापेक्षा शाकाहारच अधिक उपयुक्त आहे. व्हिएटकाँग सैन्यातील गनिमी सैनिक फक्त तांदूळ आणि भाजीपालाच खातात. त्यामुळे त्यांचे घ्राणेंद्रिय अधिक तीक्ष्ण असते. मांसाहारी सैन्याचा वास त्यांना ३० ते ५० यार्डावरूनच येतो असा त्यांचा दावा आहे.

**मांसाच्या आयातीस बंदी**—जपानमधील लोकांना अर्जेंटायना, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया ह्या देशांकडून मांसाचा पुरवठा होतो. ह्या देशांकडून जपान दरसाल १ लाख टन मांस आयात करतो. अलीकडे अर्जेंटायनातून आलेल्या दोन बोटींतील मांसाच्या पुरवठ्यात दोषी तापाचे जंतू आढळून आले. त्यामुळे परदेशांतून येणाऱ्या मांसाच्या पुरवठ्याची तपासणी झाल्याखेरीज जपानमध्ये मांस येऊ देण्यात येणार नाही. परिणामी जपानमध्ये मांसाची टंचाई भासणार आहे. बंदीपूर्वी आयात करण्यात आलेल्या १ हजार टन मांसाचा नाश करण्यात आला.

**केरळमध्ये ॲल्युमिनमचा कारखाना**—केरळ राज्यात खाजगी मालकीच्या विभागात ॲल्युमिनमचा एक मोठा कारखाना काढण्यात येणार आहे. त्याच्या उभारणीसाठी २२ कोटी रुपये लागतील. कारखान्याच्या उभारणीसाठी लागणारा परवाना मिळालेला आहे. त्याची वार्षिक उत्पादनक्षमता ८०,००० टनांची राहील. उभारणीच्या कामाला प्रारंभ झाल्यापासून २ वर्षांत उत्पादनास सुरुवात होईल. भारतात स्थापन करण्यात येणारा हा एक मोठ्यांपैकी कारखाना आहे.

**सिनेमागृहाचा परवाना रद्द**—जामनगर येथील एका सिनेमागृहाचा परवाना रद्द करण्यात आला आहे. खेळ संपल्यावर राष्ट्रगीत वाजविण्याच्या वेळी सिनेमागृहाचे दरवाजे खुले करण्यात आले. प्रेक्षक गीतासाठी न थांबता निघून गेले. हा सर्व प्रकार खुद्द कलेक्टरच्या हजेरीतच झाला; कारण ते स्वतःच सिनेमाला आले होते. सिनेमागृहाचा परवाना ह्या कारणासाठी रद्द होण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे.

**औद्योगिक कारभाराचा शिक्षण वर्ग**—औद्योगिक संघटनांचा कारभार चालविण्याचे शिक्षण देणारा एक वर्ग अहमदाबाद येथील लघु उद्योग संघातर्फे चालविण्यात येणार आहे. वर्ग २० सप्टेंबरपासून सुरू करण्यात येणार असून ८ आठवडे चालविण्यात येणार आहे. लघु उद्योगधंद्यांचे मालक, भागीदार, संचालक, पर्यवेक्षक आणि हिशेब तपासणीस ह्यांच्यासाठी तो प्रामुख्याने काढण्यात आला आहे.

**हैदराबादच्या स्त्री-मेयर**—हैदराबाद शहराच्या मेयर म्हणून श्रीमती सरोजिनी देवी ह्यांची निवडणूक झाली आहे. त्या सामाजिक कार्यकर्त्या असून ३५ वर्षांच्या आहेत. हैदराबादच्या नगरपालिकेच्या १०० वर्षांच्या इतिहासात मेयरपदावर एका स्त्रीची निवडणूक होण्याचा हा दुसरा प्रसंग आहे. गेल्या वर्षी त्यांची ह्या पदावर प्रथम निवड झाली होती. मेयरपदावर निवड झालेल्या व्यक्तींत त्या वयाने सर्वांत लहान आहेत.

**नव्या औषधाचा शोध**—अमेरिकेंतील हॉपकिन्स विद्यापीठांतील शास्त्रज्ञ अवकाशयानाच्या चालकांना व पहाड चढणाऱ्यांना उपयोगी पडेल अशा प्रकारचें एक औषध शोधून काढण्याच्या प्रयत्नांत आहेत. ह्या औषधामुळें उंचीवरील प्रवास करण्यास लागणारी अनुकूल शारीरिक परिस्थिति जलद उत्पन्न होईल. शिवाय हें औषध श्वासोच्छ्वासविषयक रोगांवरहि परिणामकारक ठरण्याची शक्यता आहे.


**विचारलहरींचें प्रक्षेपण**—राजस्थान विद्यापीठांतील मानसशास्त्राचे प्रा. डॉ. बॅनर्जी ह्यांच्या मतानें टेलिपथी अथवा विचारलहरींच्या प्रक्षेपणाला हल्लींच्या अवकाश युगांत महत्त्व येणार आहे. अवकाशांतून संचार करतांना कांहीं वेळा अवकाशयानांतील संदेशवहन करणारी यांत्रिक साधनें नीट काम देत नाहींत. कधीं कधीं तर तीं बंदहि पडतात. अशा वेळीं विचारलहरी प्रक्षेपणाच्या साह्यानें कांहीं मार्ग काढतां येईल काय ह्याविषयीं रशिआ व अमेरिका ह्या देशांत प्रयत्न करण्यांत येत आहेत. रेडिओलहरींपेक्षाहि विचारलहरींच्या प्रक्षेपणानें दळणवळणांतील अडथळे चांगल्या रीतीनें दूर करता येण्याची शक्यता आहे.

**भारत–युगोस्लाव्हिआ व्यापार**—भारत व युगोस्लाव्हिआ ह्यांच्या दरम्यान व्यापार-व्यवहार करणाऱ्या धंदेवाइकांच्या गटाची स्थापना कलकत्ता येथें करण्यांत आली आहे. उभयतांपुढें असणारे प्रश्न आणि नवीन औद्योगिक संघटना ह्यांच्याविषयीं गटांत विचारविनिमय करण्यांत येईल. गेल्या कांहीं वर्षांत ह्या दोन देशांमधील व्यापार खूपच वाढत चाललेला आहे. उभयता देशांमधील व्यापारी व आर्थिक हितसंबंध झपाट्यानें वाढण्यास ह्या गटाचा चांगला उपयोग होईल.

**आयुर्विमा कॉर्पोरेशनचें काम**—१९६५–६६ च्या पहिल्या चार महिन्यांत आयुर्विमा कॉर्पोरेशननें १४०.३५ कोटी रुपये किमतीचे नवे विमे उतरविले. गेल्या वर्षाच्या ह्याच काळांतील नव्या कामाचा आंकडा १३२.३ कोटी रुपयांचा होता. सर्व विभागांत दक्षिण विभागाचा अनुक्रम पहिला आहे. ह्या विभागांत ९४,३५६ नवे विमे देण्यांत आले. त्यांची दर्शनी किंमत ३८.९ कोटी रुपये आहे. त्याखालोखाल पश्चिम विभागांत ३६.४ कोटी रुपयांचे ६९,०४१ विमे उतरण्यांत आले.

**पूर्व पाकिस्तानांत चिन्यांची वसाहत**—१९६२ सालीं चीनने भारताच्या उत्तर सरहद्दीवर हल्ला केल्यावर पूर्व पाकिस्तानांतील बहुतेक चिनी नागरिक मायदेशीं परत गेले. त्यांच्यापैकी जे मागे राहिले त्यांनीं पूर्वपाकिस्तानांत आपली एक वसाहत स्थापण्यास आरंभ केला आहे. पाकिस्तान सरकारने त्यांच्या वसाहतीसाठी ५०० विघे जमीन विनामूल्य दिली आहे. पाकिस्तानच्या सैनिकांना गनिमी युद्धतंत्र शिकविण्याबद्दल दिलेला हा मोबदला आहे.

**विमानतळांची सुरक्षितता**—विमानांना होणाऱ्या अपघातांपैकी बहुसंख्य अपघात चढतांना अगर उतरतांना होतात असा अनुभव आहे. अपघात टाळण्यासाठी लागणाऱ्या अनेक प्रकारच्या यंत्रसामग्रीचे २२ संच झेकोस्लोव्हाकिआने भारताला द्यावयाचे कबूल केलें आहे. ह्या यंत्रसामग्रीपैकी कांहीं भाग भारतांत तयार करण्यासाठी लागणारी तांत्रिक मदतहि देण्यास झेकोस्लोव्हाकिआ तयार आहे. अशा प्रकारचे आणखी कांहीं संच मिळवून ते विमानतळांवर बसविण्याविषयीं उभयता देशांत वाटाघाटी चालू आहेत.

# अर्थ

बुधवार, १५ सप्टेंबर, १९६५



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पाकिस्तानच्या खऱ्या हेतूची जाणीव झाली

काश्मीरवरील हक्कासंबंधी भारत व पाकिस्तान ह्यांच्यात जो वाद आहे त्यात ब्रिटनमधील वृत्तपत्रे नेहमीच पाकिस्तानची बाजू घेत आलेली आहेत. परंतु गेल्या महिन्याच्या ५ तारखेपासून पाकिस्तानने काश्मीरवर जे छुपे आक्रमण चालविले त्यासंबंधी लंडन टाइम्सने ह्या वेळी घेतलेली भूमिका बरीच निःसंदिग्ध आणि खऱ्या परिस्थितीची जाणीव ठेवणारी आहे. लंडन टाइम्सच्या मताने भारताबरोबर सर्वकष युद्ध करण्यासंबंधी पाकिस्तान सर्व बाजूंनी विचार करीत आहे. हे युद्ध ब्रिटन टाळू शकणार नाही आणि म्हणूनच येते काही आठवडे निर्णायक ठरणार आहेत. 'टाइम्स'च्या रावळपिंडी येथील वार्ताहराने धाडलेले वरील आशयाचे वृत्त काहीशा उशिराने तेथील वृत्तनियंत्रकाने मंजूर केलेले आहे ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. काश्मीरच्या प्रश्नावर ह्यापूर्वी अनेकदा आणीबाणीची परिस्थिती निर्माण झालेली आहे. परंतु ह्या वेळी काय प्रकार घडला तो स्वच्छ आहे, अशी कबुलीच वरील वार्तापत्रात देण्यात आलेली आहे. वार्तापत्रात दिलेल्या माहितीप्रमाणे ह्या वर्षाच्या आरंभापासून पाकिस्तानने 'मुजाहिद' ह्या निमलष्करी संघटनेची स्थापना केली. ह्या संघटनेची सर्व सूत्रे पाकिस्तानच्या लष्करी अधिकाऱ्यांच्या हातात होती. काश्मीरच्या भारताच्या ताब्यातील भागात जे छुपे गनिम घुसविण्यात आले होते ते पाकिस्तानच्या हद्दीतूनच आले होते आणि त्याचा सर्व कार्यक्रम पाकिस्तान सरकारने आखून दिलेला होता. काश्मीरवरील हे छुपे आक्रमण करण्यात पाकिस्तानचा हेतू भारताला राजनैतिक दडपणाने नमविण्याचा होता. कच्छच्या रणात नुकत्याच ज्या चकमकी झाल्या त्यावरून पाकिस्तानला हे कळून चुकले की, भारताने आपल्या भूमिकेवर खंबीर राहण्याचा कितीही निर्धार केला तरी त्यापासून माघार घेण्यास लावण्याचे सामर्थ्य अशा दडपणात आहे.

---

## विकासशील देशांत नजीकच्या काळात दुष्काळ

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेती उपसंघटनेने बेलग्रेड येथे दुसरी जागतिक लोकसंख्या परिषद भरविली होती. पहिली परिषद १० वर्षांपूर्वी भरविण्यात आली होती. बेलग्रेड येथील परिषदेला ६० देशांचे मिळून १ हजार प्रतिनिधी हजर राहिले होते. परिषदेत भाषण करताना शेती व अन्न उपसंघटनेचे प्रमुख डॉ. बी. आर. सेन म्हणाले, की विकासाची वाटचाल करणाऱ्या देशांत अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ होत नाही. अन्नधान्याची वाढ होण्यासंबंधी प्रगती न झाल्यास येत्या ५ ते १० वर्षांच्या अवधीत जगाच्या दाट लोकवस्ती असलेल्या भागांत गंभीर स्वरूपाचा दुष्काळ पडल्याशिवाय राहणार नाही. जागतिक लोकसंख्येची तिसरी पाहणी अलीकडे करण्यात आली आहे. तीवरून असे दिसते की जगाच्या लोकसंख्येपैकी १० ते १५ टक्के लोक अर्धपोटी दिवस कंठीत आहेत. जवळ जवळ निम्मे लोक भुकेची आंच सोसीत आहेत, अगर कनिष्ठ प्रतीच्या आहारावर भागवीत आहेत. अन्नधान्याचे उत्पादन आणि लोकसंख्येची वाढ ह्यांच्यातील प्रमाण समतोल राहिले आणि अन्नाच्या दरडोई खपाचे प्रमाण सध्या इतकेच राहिले तरीसुद्धा चालू शतकाच्या अखेरीस अर्धपोटी राहणाऱ्या अगर निकस आहार घेणाऱ्या लोकांची संख्या आजच्यापेक्षा दुप्पट होईल. लोकसंख्येची वाढ, शहरात होणारी लोकांची गर्दी आणि पैशाच्या रूपांतील वाढती उत्पन्ने ह्यामुळे लोकांच्या अन्नावर कराव्या लागणाऱ्या खर्चात सर्वात अधिक वाढ झालेली आहे. भारतातही अशीच परिस्थिती उत्पन्न झाली आहे. सध्याची परिस्थिती केवळ टिकवून धरण्यासाठी अन्नाच्या उत्पादनात दरसाल ४ टक्के वाढ होणे अगत्याचे आहे. ही वाढ घडवून आणण्यासाठी लागणारे शास्त्रीय व तांत्रिक ज्ञान पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

---

## भ्रष्टाचारांच्या प्रकरणासंबंधीचा अहवाल

राज्यकारभारातील भ्रष्टाचारावर नजर ठेवण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या कमिशनचा १९६४–६५ सालचा अहवाल प्रसिद्ध करण्यात आला आहे. सरकारी नोकरांच्या बाबतीत भ्रष्टाचाराची ३,५१४ प्रकरणे अहवालात नोंदण्यात आली आहेत. नोंदल्या गेलेल्या प्रकरणांपैकी ५७·८२ टक्के तक्रारी निनावी होत्या. उरलेल्या १,४८२ प्रकरणांपैकी ६२४ तक्रारी गॅझेटेड ऑफिसर्सविरुद्ध केलेल्या होत्या, ४८७ बिगर–गॅझेटेड नोकरांविरुद्ध होत्या आणि ३७१ तक्रारी सार्वजनिक संघटनांच्या अधिकाऱ्यांविरुद्ध होत्या. ७८३ तक्रारी ह्या कमीअधिक प्रमाणात संदिग्ध स्वरूपाच्या होत्या; किंवा त्यांची शहानिशा करण्यासारख्या नव्हत्या. उरलेल्या ६९९ तक्रारींपैकी ४३६ तक्रारी संबंधीत मंत्र्यांकडे अगर खात्याकडे चौकशी करण्यासाठी पाठविण्यात आल्या. २७ तक्रारी चौकशी करण्यासाठी मध्यवर्ती तपासणी मंडळाकडे सुपूर्त करण्यात आल्या; आणि २३६ तक्रारी संबंधीत खात्यांच्या मुख्य चौकशी–अधिकाऱ्याकडे पाठविण्यात आल्या. ९१ प्रकरणांच्या बाबतीत अहवाल सादर करण्यात आले. मध्यवर्ती तपासणी मंडळाने १० प्रकरणे प्राथमिक चौकशी करण्यास योग्य अगर रीतसर चौकशी करण्यास योग्य अशी ठरविली. मध्यवर्ती तपासणी मंडळाकडून आलेल्या अहवालाप्रमाणे १८९ अधिकाऱ्यांना मोठ्या शिक्षा देण्याची शिफारस करण्यात आली. त्यांत १३ प्रकरणे लष्करी चौकशीस योग्य अशी होती. ३८ अधिकाऱ्यांच्या बाबतीत छोट्या शिक्षांचा सल्ला देण्यात आला. ५४ अधिकाऱ्यांना समज देण्याची शिफारस करण्यात आली आणि ११९ अधिकाऱ्यांना निर्दोषी ठरविण्यात आले. ४८ कंपन्यांची नावे काळ्या यादीत घालण्यात आली.

---

## रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटि गव्हर्नरांचा कर्जासाठी दौरा

रिझर्व्ह बँकेचे डेप्युटि गव्हर्नर आणि इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट बँकेचे व्हाइस चेअरमन डॉ. बी. के. मदन, हे युरोपच्या आणि ग्रेटब्रिटनच्या दौऱ्यावर गेले होते. त्यांच्या दौऱ्याचा हेतू तेथील बँका व इतर संघटना ह्यांचेकडून कर्जे मिळण्याचा प्रयत्न करणे हा होता. ते आता बहुधा परतले असावेत.

### भारतातील वृत्तपत्रांचा खप

१९६३ अखेर भारतात एकूण ७,८०० वृत्तपत्रे आणि नियतकालिके प्रसिद्ध होत होती. त्यापैकी ४,५७० ची माहिती रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्सकडे उपलब्ध आहे. त्या सर्वांचा मिळून खप २ कोटी प्रतींचा आहे. ४७ इंग्रजी वृत्तपत्रांचा मिळून एकूण खप १४,५२,००० होता. हिंदीमध्ये ८६ वृत्तपत्रे असून त्यांचा खप ७,६४,००० पेक्षा जास्त नव्हता. इतर भाषांतील वृत्तपत्रे आणि त्यांचा खप, ह्यांचे आकडे खाली दिले आहेत. इंग्रजी इंडियन एक्सप्रेसचा खप सर्वांत जास्त (२,९५,०००) होता; त्याखाली तामीळ ठंठी (२,३३,०००), इंग्रजीमधील टाइम्स ऑफ इंडिया (१,८०,०००) आणि स्टेट्समन (१,२७,०००) हे येतात. मल्याळी भाषेतील मातृभूमीचा खप १,३९,००० होता.


| भाषा | वृत्तपत्रांची संख्या | एकूण खप |
|---|---|---|
| आसामी | १ | ७,००० |
| बंगाली | ४ | २०३,००० |
| गुजराती | २८ | ४४१,००० |
| कन्नड | २२ | १७४,००० |
| मल्याळी | २६ | ६१३,००० |
| मराठी | २९ | ५३६,००० |
| ओरिया | ५ | ७५,००० |
| पंजाबी | ८ | ४६,००० |
| तामीळ | २४ | ६८८,००० |
| तेलगू | ९ | १७७,००० |
| उर्दू | ४४ | २६०,००० |
| द्विभाषिक | ४ | २२,००० |
| बहुभाषिक | १ | ? |
| इतर | ७ | २१,००० |

### सौराष्ट्रात मिठाचा पडून राहिलेला साठा

सौराष्ट्र आणि तुतीकोरीन येथे मिठाचे प्रचंड साठे वाहतुकीच्या बोटींच्या अभावी पडून राहिलेले आहेत. भारतामधून जपानला मीठ निर्यात करण्यांत येतें. ह्या निर्यातीपासून मिळणाऱ्या परदेशीय चलनांतून जपानी वाहतुकीच्या बोटी घेण्यांत याव्या, अशी मागणी मिठाच्या व्यापाऱ्यांनीं केली आहे. किनाऱ्यानजीकची दर्यावर्दी वाहतूक करणाऱ्या बोटींचा तुटवडा आहे. १४ बोटी निकामी झालेल्या आहेत. ५ बोटी तांदुळाच्या वाहतुकीसाठी राखून ठेवण्यात आलेल्या आहेत. ४७ बोटी कोळशाच्या वाहतुकीसाठी नेहमीच लागतात. त्यामुळे सौराष्ट्रामधील मिठाचे साठे हलविण्यासाठी मर्यादित प्रमाणांतच बोटी मिळू शकतात. शिवाय, मिठाच्या वाहतुकीसाठी देण्यात येणारे भाडे वाहतूक कंपन्यांना कमी वाटत आहे. दरम्यान, सौराष्ट्रामधील बंदरांतून १८ लाख टन मीठ तसेच पडून आहे.

### आकाशवाणीवरील जन्म-मृत्युदिन

आकाशवाणी २८ भारतीयांचे जन्मदिन आणि मृत्युदिन ह्यापुढे पाळणार आहे. त्यापैकी महात्मा गांधी आणि जवाहरलाल नेहरू ह्यांचे दरसाल पाळले जातील. बाकीच्यांचे पाच वर्षांतून एकदा पाळले जातील. न्यायमूर्ती रानडे, सुभाषचंद्र बोस, लाला लजपतराय, सरोजिनी नायडू, मोतीलाल नेहरू, गोपाळ कृष्ण गोखले आणि सरदार पटेल ह्यांचे जन्मदिन पाळण्याचे ठरले आहे. कस्तुरबा गांधी, मौलाना अबुल कलम आझाद, सरदार भगतसिंग आणि लोकमान्य टिळक ह्यांचे मृत्युदिन पाळले जाणार आहेत.






ठाकरसी फॅब्रिक्स

फॅशनसाठी सर्वोत्तम पसंती; सॅन्फोराइज्ड कापड SANFORIZED
सूटिंग, शर्टिंग, सुंदर, साधे आणि
डिझाइन्सचे, तऱ्हेतऱ्हेचे कापड असे हे आवडते पुरुषांचे
THACKERSEY FABRICS
ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स •धी क्राऊन स्पिनिंग अँण्ड मॅन्युफॅक्चरिंग कं. लि. •धी इंडियन मॅन्युफॅक्चरिंग कं. लि. •धी हिंदुस्तान स्पिनिंग अँण्ड वीव्हिंग मिल्स कं. लि.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting



GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

## १९६४–६५ मधील आर्थिक घडामोडींचा आढावा

रिझर्व्ह बँकेचा वरील आढावा प्रसिद्ध झाला आहे, त्यात वाढती महागाई, गुंतवणुकीसाठी पैसा उभारण्यातील अडचणी आणि परदेशी हुंडणावळीच्या शिलकीतील मोठी घट, ह्यांचा प्रामुख्याने उल्लेख केलेला आहे.

ओळीने तिसऱ्या वर्षी शेतीचे उत्पादन पूर्ववतच राहिले, औद्योगिक उत्पादनाची गती मंदावली, सरकारी उपक्रमांवरील सर्व वाढला, खासगी गुंतवणूकही वाढली. पुरवठ्याचे मानाने मागणी फार होती. १९६२–६३ मध्ये किमती ३·२% वाढल्या, १९६३–६४ मध्ये त्या ५·८% वाढल्या तर १९६४–६५ मध्ये त्या १२·९% वाढल्या. लोकसंख्येची वाढ आणि शहरांची वाढ, ह्या दीर्घकालीन कारणात लोकांच्या पैशाच्या स्वरूपातील उत्पन्नात वाढ, व्यापाऱ्यांची साठेबाजी आणि वढत्या शेतकऱ्यांची साठा करण्याच्या शक्तीत वाढ, ह्या कारणांची भर पडली. ह्या सर्व कारणांमुळे आर्थिक तंगी वाढली.

१९६४–६५ मध्ये पैशाच्या पुरवठ्यात ८·७% ची भर पडली; १९६३–६४ मधील तत्सम टक्केवारी १३·४% होती. मालाची भाववाढ होत गेली, तरी औद्योगिक रोख्यांच्या किमतीत त्याचे प्रतिबिंब फारसे पडले नाही. निर्गतीमध्ये वाढ न होता सरकारमार्फत होणारी अन्नधान्यांची, खतांची आणि भांडवली साहित्याची आयात वाढली. परदेशी हुंडणावळीवरील ताण कमी करण्यासाठी इंटरनॅशनल मोनेटरी फंडाकडून कर्ज घ्यावे लागले, सरकारजवळील सोने रिझर्व्ह बँकेकडे वर्ग करावे लागले आणि वर्षाच्या उत्तरार्धात प्रतिबंधक आयात कर बसविणे भाग पडले.

१९६४ च्या मंदीच्या मोसमात बँकांचा कर्जपुरवठा पुरेसा आकुंचन पावला नाही, किमती चढल्या, परदेशी हुंडणावळ दुर्मिळ झाली, त्यामुळे रिझर्व्ह बँकेच्या पतविषयक धोरणात मोठा बदल करावा लागला. कर्जपुरवठ्याबाबत नियंत्रणे घालावी लागली, त्याचबरोबर रिझर्व्ह बँक शेड्यूल्ड बँकांना करीत असलेला कर्जपुरवठा महाग करण्यात आला. व्याजाचे दर सुधारून बचतीस चालना देण्यात आली. २५ सप्टेंबर, १९६४ रोजी बँक रेट ४½% चा ५% केला; कर्जावरील व्याजाच्या दरपद्धतीत बदल केला. नव्या पद्धतीप्रमाणे, शेड्यूल्ड बँकेच्या 'लिक्विडिटी' वर कर्जावरील व्याजाचा दर अवलंबून ठेवण्यात आला. १७ फेब्रुवारी रोजी बँक रेट आणखी एका टक्क्याने वाढवून तो ६% करण्यात आला आणि शेड्यूल्ड बँकांना मिळावयाची कर्जे आणखी अवघड करण्यात आली.

### अन्नपदार्थांच्या घाऊक किमती
(१९५२–५३ = १००)

| | | मार्चअखेर | | |
|---|---|---|---|---|
| | १९५२–५३ | १९६३ | १९६४ | १९६५ |
| अन्नपदार्थ | १०० | १२३·५ | १४१·० | १५३·७ |
| १. धान्ये | १०० | १०२·८ | १२१·५ | १४०·३ |
| (अ) तांदूळ | १०० | १११·४ | १२२·२ | १२८·३ |
| (ब) गहू | १०० | ८६·० | ११७·७ | १४३·७ |
| (क) ज्वारी | १०० | १०६·३ | १३४·२ | १९२·३ |
| (ड) बाजरी | १०० | ११४·६ | १४५·२ | १८१·० |
| २. डाळी | १०० | ९९·४ | १३३·१ | १५२·२ |
| ३. दूध, तूप | १०० | १२६·१ | १३१·६ | १५०·८ |
| ४. तेले | १०० | १३९·७ | १६३·४ | १८५·४ |
| ५. साखर | १०० | १४०·६ | १४५·२ | १५१·१ |
| ६. गूळ | १०० | १५२·८ | १८१·६ | १५६·८ |

### राष्ट्रीय उत्पन्न, घाऊक किमती आणि पैशाचा पुरवठा

| | राष्ट्रीय उत्पन्न | | घाऊक किमतींचा इंडेक्स नंबर | | पैशाचा पुरवठा | |
|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | कोटी रु. | [illegible] | [illegible] | [illegible] | कोटी रु. | [illegible] |
| १९५५-५६ | १०,४८० | १००·० | ९९·२ | १००·० | २,२१७ | १००·० |
| १९५६-५७ | ११,००० | १०५·० | १०४·२ | १०५·९ | २,३४१ | १०५·६ |
| १९५७-५८ | १०,८९० | १०३·९ | १०६·१ | १०६·९ | २,४१३ | १०८·९ |
| १९५८-५९ | ११,६५० | १११·२ | ११२·१ | ११३·० | २,५२६ | ११३·९ |
| १९५९-६० | १ ,८६० | ११३·२ | ११८·७ | ११९·६ | २,७२० | १२२·७ |
| १९६०-६१ | १२,७३० | १२१·५ | १२७·५ | १२८·५ | २,८६८ | १२९·४ |
| १९६१-६२ | १३,०६० | १२४·६ | १२२·९ | १२३·९ | ३,०४५ | १३७·४ |
| १९६२-६३ | १३,३१० | १२७·० | १२७·४ | १२८·४ | ३,३१० | १४९·३ |
| १९६३-६४ | १३,९१० | १३२·७ | १३६·९ | १४०·० | ३,६५२ | १६९·२ |
| १९६४-६५ | १४,८८० | १४२·० | १४१·० | १५२·३ | ४,०७५ | १८३·८ |

### घाऊक मालाच्या किमतींचे इंडेक्स नंबर
(१९५२–५३=१००)

| | २६ जून १९६५ | २७ जून १९६४ | २९ जून १९६३ | (२)च्या मानाने (१) मध्ये बदल % | (३)च्या मानाने (१) मध्ये बदल % |
|---|---|---|---|---|---|
| अन्नपदार्थ | १६१·२ | १५५·१ | १३६·९ | +४·० | +१७·८ |
| मद्य, तंबाखू | १३८·३ | १२७·७ | १२०·१ | +८·८ | +१५·७ |
| सर्पण, वीज इ. | १४७·२ | १४३·० | १३९·९ | +३·० | + ५·३ |
| औद्योगिक | | | | | |
| कच्चा माल | १७७·६ | १५४·९ | १३९·० | +१४·८ | +२७·९ |
| तयार माल | १४४·४ | १३३·५ | १३०·३ | + ८·२ | +१०·८ |
| कपास कापड | १३७·९ | १३५·३ | १३५·३ | + १·९ | + १·९ |
| तागाचे कापड | १३८·४ | ९९·२ | ९९·२ | +३९·५ | +३९·५ |
| लोकरी कापड | १७०·३ | १६९·२ | १४२·७ | + ०·७ | +१९·३ |
| धातूचे पदार्थ | १७८·९ | १६९·० | १६१·५ | + ५·९ | +१०·८ |
| पेंड | २२८·४ | १९०·८ | १६८·० | +१९·७ | +३५·४ |
| यंत्रसामग्री | १३३·४ | १२६·९ | १२३·२ | + ५·१ | + ८·३ |
| एकत्रित | १५८·१ | १४७·९ | १३५·० | + ६·९ | +१७·१ |

### राहणीच्या खर्चात होत गेलेली वाढ

| | तुलनेचा पाया | मार्च १९६४ | मार्च १९६५ | वाढ (+) घट (−) | % |
|---|---|---|---|---|---|
| मुंबई— | १९४९=१०० | १६२ | १७३ | + | ६·८ |
| कटक | „ | १५५ | १८१ | + | १६·८ |
| दिल्ली | „ | १४५ | १५५ | + | ६·९ |
| मद्रास | „ | १५८ | १८० | + | १८·४ |
| नागपूर | „ | १५६ | १८१ | + | १६·० |
| कलकत्ता | १९६०=१०० | ११५ | १२४ | + | ७·८ |
| भारत | १९४९=१०० | १४३ | १५९ | + | ११·२ |

---

### आय. ए. एस. ला पगारवाढीची आवश्यकता

विद्यापीठातून बाहेर पडणाऱ्या पदवीधरांची संख्या झपाट्याने वाढत असली, तरी युनियन पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या गेल्या काही वर्षात गतीने घटत चालली आहे आणि त्यांचा दर्जाही उतरत चालला आहे, असे गृह खात्याने जाहीर करून आय. ए. एस.च्या सुरुवातीच्या पगारात वाढ करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. जॉइंट सेक्रेटरी व त्याच्या वरच्या दर्जाच्या लोकांचे पगार ह्यापूर्वीच वाढविण्यात आलेले आहेत.

## वाफेच्या रेल्वे इंजिनांच्या उत्पादनांत कपात

चित्तरंजन येथील रेल्वे एंजिनें तयार करण्याच्या कारखान्यांत उत्पादन करण्यांत येणाऱ्या वाफेच्या इंजिनांच्या संख्येंत कपात करण्याचें धोरण रेल्वे बोर्डानें स्वीकारलें आहे. रेल्वेवरील वहातूक करण्याच्या कामीं विजेवर व तेलावर चालणाऱ्या एंजिनांवर भर देण्याचें ठरविण्यांत आलें आहे. वाफेवर चालणाऱ्या एंजिनांपेक्षा विजेचीं व तेलाचीं रेल्वे एंजिनें अधिक वजन व तेही अधिक वेगानें खेचूं शकतात. त्यामुळें रेल्वेवर चालणारीं वाफेचीं इंजिनें हळूहळू कमी करण्यांत येतील व अखेर पूर्णपणें मावळतील. १९६४-६५ ह्या वर्षीत चित्तरंजन येथील कारखान्यांत १७० वाफेवर चालणारीं एंजिनें निर्माण करण्यांत आलीं. चालू वर्षीं मात्र १०० एंजिनेंच उत्पादन करण्याचें ठरविण्यांत आलें आहे. चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत ह्या कारखान्यांत फक्त ३९० वाफेचीं एंजिनें तयार करण्यांत येतील. वाफेच्या एंजिनाच्या उत्पादनांत कपात करून आतां विजेचीं व तेलाचीं एंजिने तयार करण्यांवर भर देण्यांत येईल. सध्यां ए. सी. वीज-प्रवाहावर चालणारी ३ एंजिनें दरमहा तयार करण्यांत येतात. पुढील वर्षीं त्यांची संख्या ८१ पर्यंत वाढविण्यांत येईल. १९६७-६८ सालीं १००, १९६८-६९ सालीं १२०, आणि चौथ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटच्या दोन वर्षांत प्रत्येकी १५० एंजिनें तयार करण्यांत येणार आहेत. त्याशिवाय डी. सी. प्रवाहावर चालणारीं ५७ एंजिनेंहि तयार करण्यांत येणार आहेत. चित्तरंजन येथील कारखान्यांत तयार होणाऱ्या विजेच्या एंजिनांत अजून ५० टक्के किंमतीचे भाग परदेशांतून आयात केलेले वापरावे लागतात. म्हणजे ह्या बाबतींत अधिक स्वयंपूर्णता येणें आवश्यक आहे. चौथ्या कार्यक्रमाच्या अखेरीस आयात केलेल्या भागांचा वापर किमतीच्या २० टक्क्यांपर्यंत खाली आणला जाईल.

## काँक्रीटच्या रेल्वे स्लीपर्सचा उपयोग

रेल्वेच्या रुळाखाली घालण्यात येणारे स्लीपर्स बहुधा लाकडाचे असतात. रेल्वेबोर्डाच्या १९६३-६४ सालच्या अहवालात त्यासाठी १ कोटी स्लीपर्स वापरण्यात आल्याचा उल्लेख आहे. पण त्यांपैकी अवघे ६,२०७ स्लीपर्स काँक्रीटचे बनविण्यात आले होते. वास्तविक काँक्रिटचे स्लीपर्स चांगले काम देतात, असा अनुभव आहे. हा अनुभव लक्षात घेऊन भारत सरकारने काँक्रिटचे स्लीपर्स वापरण्याचा निर्णय घेतला आहे. असे स्लीपर्स तयार करणारे तीन कारखाने काढण्याचेही सरकारने ठरविले आहे. कारखाने सार्वजनिक मालकीच्या विभागात स्थापन करण्यात येतील. अशा प्रकारचे स्लीपर्स जर्मन रेल्वे वापरीत आहेत. काँक्रिटचे स्लीपर्स तयार करण्यास कमी लोखंड लागेल. नुसत्या लोखंडाचे अगर पोलादाचेही स्लीपर्स तयार करता येतात. परंतु त्यासाठी अधिक लोखंड लागते. स्लीपर्ससाठी सिमेंटच्या पुरवठ्याचा प्रश्न तितकासा बिकट नाही. शिवाय भारतासारख्या उष्ण प्रदेशात हे स्लीपर्स वापरणे अधिक उपयुक्त आहे.

**भावनगर बंदराचा विकास**—गुजरात राज्याच्या ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमात भावनगर बंदराच्या विकासासाठी ८७.७५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. बंदरामधील गाळ काढण्याच्या प्रश्नाचाही विचार बंदराच्या सल्लागार कमिटीने केला. भावनगर बंदरातून होणाऱ्या खाद्यतेलाच्या वाहतुकीत वाढ होत असल्यामुळे खाद्यतेलाच्या साठवणुकीसाठी टाक्या बसविण्यात येणार आहेत.

## अन्नपदार्थांतील भेसळ थांबविण्याची योजना

अन्नपदार्थांतील भेसळ थांबविण्याची एक योजना भारत सरकारच्या अन्नखात्याने चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात समविष्ट करण्यासाठी तयार केली असून ती नियोजन समितीकडे मंजुरीसाठी पाठविली आहे. ह्या योजनेच्या अंमलबजावणीसाठी १२ कोटी रुपये खर्चाची तरतूद करावी लागेल. अन्नपदार्थांची भेसळ थांबविण्यासाठी असलेल्या राज्य सरकारांच्या अंमलबजावणी-यंत्रणेला अधिक मजबुती यावी म्हणून ४.५५ कोटी रुपयांची मदत देण्यांत येणार आहे. अन्नाच्या दर्जावर लक्ष ठेवणाऱ्या मध्यवर्ती कमिटीने भेसळ थांबविण्याची जबाबदारी भारत सरकारने स्वतःकडे घ्यावी असे सुचविलें आहे. अलीकडे खाण्याच्या पदार्थांत भेसळ करण्याबद्दल भरण्यात येणाऱ्या खटल्यांची संख्या वाढत चाललेली आहे. अन्नभेसळीविरुद्ध असलेला कायदा कडक रीतीने अमलात आणणे जरूर वाटू लागले आहे.

## भिक्षा न मिळाल्याचा परिणाम

महागाई भडकत चालल्यामुळे भिक्षेकऱ्यांना भिक्षा घालण्याची प्रवृत्ती कमी होत चालली आहे. बिहारमधील एका ठिकाणच्या भिक्षेकऱ्यांनी आपली पोटापाण्याची सोय लावण्यासाठी सरकारकडे एक अर्जच दाखल केला. भिकाऱ्यांच्या ह्या टोळीत ३० भिक्षेकरी होते आणि ते म्हातारे अगर महारोगाने अपंग झालेले होते. त्यांनी आपल्या अर्जात असे म्हटले आहे की भिक्षा मागून मिळेल त्यावर निर्वाह करणे आता अशक्य झालेले आहे. अन्नधान्याची टंचाई आणि महागाई ह्यांच्यामुळे घरधनीणींनी भिक्षा घालण्याचे बंद केलेले आहे. त्यामुळे भिकाऱ्यांच्या योगक्षेमाची जबाबदारी आता सरकारनेच घेतली पाहिजे. भिकारी समाजहित संवर्धनाच्या कक्षेत येत नसल्यामुळे त्यांच्या अर्जाची दखल घेण्यात आली नाही.

## इंडियन मर्चंटस चेंबरचे अर्थमंत्र्यांना निवेदन

मध्यवर्ती सरकारने केलेल्या पुरवणी-अंदाजपत्रकासंबंधी मुंबईच्या इंडियन मर्चंटस चेंबरने एक निवेदन अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी ह्यांचेकडे पाठविले आहे. घोर आर्थिक संकट आणि अस्थैर्य टाळावयाचे असेल तर आर्थिक परिस्थितीची अधिक वस्तुनिष्ठ दखल घेण्यात आली पाहिजे असे निवेदनात सुचविण्यात आले आहे. निवेदन पुढे म्हणते की पुरवणी अंदाजपत्रकात बसविण्यात आलेल्या नव्या करांमुळे लोकांवर डोईजड भार पडणार आहे. इतके जबर कर लादणे समर्थनीय ठरणार नाही. संरक्षणावरील खर्च भागविण्यासाठी उत्पन्नाच्या नव्या बाबी शोधून काढणे आवश्यक असले तरी हाती येत असलेला पैसा जपून वापरून अतिशय काटकसरीने खर्च करण्यात आला पाहिजे. नवीन कर सरकारचा जादा खर्च भागविण्यासाठी बसविण्यात आले आहेत व त्यामुळे चलनवाढीची तीव्रता वाढलेली आहे.

**तेल गाळण्याची गिरणी**—उत्तर नायजेरियातील भुईमुगाचे तेल काढणाऱ्या एका गिरणीचा विस्तार करण्यासाठी भारत-सरकारने बिर्ला ब्रदर्स कंपनीला सहकार्य करण्याचा परवाना दिला आहे. कंपनीविस्तारासाठी लागणारी यंत्रसामग्री व इतर साधने पुरवील आणि तांत्रिक सल्लाही देईल. आफ्रिकेंतील देशात शेंगदाण्यांच्या उत्पादनाच्या बाबतीत नायजेरियाचा क्रमांक पहिला लागतो. विस्ताराचे काम पूर्ण झाल्यावर नायजेरिया शेंगदाण्याचे तेल निर्यात करू शकेल.

### पाकिस्तानच्या भारतावरील आक्रमणाची एक मीमांसा

काश्मीर पाकिस्तानात सामील व्हावे म्हणून गेली १८ वर्षे त्या देशाच्या सरकारने राजनैतिक व इतर मार्गांनी प्रयत्न करून पाहिले. हे सर्व प्रयत्न फसल्यावर पाकिस्तानने उघड उघड आक्रमणाचा मार्ग स्वीकारला. ह्याच वेळी हा धोक्याचा मार्ग का स्वीकारण्यात आला असा प्रश्न उत्पन्न होतो. ह्यासंबंधी एक कारणमीमांसा अशी आहे. १९५८ सालापासून पाकिस्तान हा देश आयूबखान ह्यांच्या लष्करी हुकूमशाहीखाली गेला. लष्करी हुकूमशाहीचे सर्व लक्ष साहजिकच लष्कराची सत्ता वाढविण्याकडे आणि प्रादेशिक विस्तार करण्याकडे केंद्रित होत असते. पाकिस्तानने युरोपातील व अमेरिकेतील काही देशांशी मैत्री प्रस्थापित केली. ह्या देशांनी पाकिस्तानला अत्याधुनिक सैनिकी रणसाहित्य पुरविले. त्यामुळे युद्धसामर्थ्याच्या काही शास्त्रांत तो देश भारतापेक्षा वरचढ ठरला. शिवाय पाकिस्तानने स्वतःही बराच पैसा लष्करावर खर्च केला. पाकिस्तानने लष्करी पेशा हा एक व्यवसायच केला असून एका सेनापतीलाच राज्यप्रमुख केले आहे. पाकिस्तानच्या लष्करातील तरुण अधिकाऱ्यांनी, काश्मीर जर राजनैतिक मार्गांनी मिळत नसेल तर ते बळाच्या जोरावर घ्यावे अशी मागणी एकसारखी जोराने चालविली होती. पाकिस्तानचे पाश्चिमात्य दोस्त जोपर्यंत काश्मीरच्या प्रश्नावर पाकिस्तानला सहानुभूती दाखवीत होते आणि राजकीय पाठिंबा देत होते तोपर्यंत ह्या मागणीला विरोध करण्यात आला. परंतु, पाकिस्तानने पाश्चिमात्य दोस्तांबद्दल विरोधी वृत्ती दाखविण्यास आरंभ करताच लष्करी साहित्याचा ओघ खुंटण्याचा धोका उत्पन्न झाला. त्याच वेळी भारताचे लष्कर मात्र आधुनिक रणसाहित्याने सज्ज करण्यात येत होते. ह्या परिस्थितीत पाकिस्तानचे हुकूमशहा अयूबखान ह्यांना असे वाटले असावे की लष्करी कारवाईने काश्मीर घेण्याचा मोका आज साधला नाही, तर तो पुन्हा कधीच मिळणार नाही.

### संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सनदेतील दुरुस्त्यांची अंमलबजावणी

दुसऱ्या महायुद्धाची समाप्ती झाल्यानंतर जगापुढील अनेक प्रश्नांची सोडवणूक करण्याचा प्रयत्न करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेची स्थापना करण्यात आली. संघटनेची सनद तयार करण्यात आली तीवर त्या वेळी ५१ राष्ट्रांनी सह्या केल्या. त्यानंतर २० वर्षांच्या काळात अनेक राजकीय उलथापालथी होऊन संघटनेच्या सभासदांची संख्या ११० पर्यंत वाढली. अर्थातच इतक्या राष्ट्रांना योग्य प्रतिनिधित्व देण्याच्या कामी सनदेतील तरतुदी अपुऱ्या पडू लागल्या. संघटनेच्या दोन उपसंघटनांची विशेषतः सुरक्षा समिती आणि आर्थिक व सामाजिक समिती ह्यांची पुनर्रचना करण्याची जरूर भासू लागली. अखेर ह्या दोन उपसंघटनांची पुनर्रचना करण्याच्या दुरुस्त्या मांडण्यात येऊन त्या मंजूर करण्यात आल्या व त्यांची अंमलबजावणीही नुकतीच सुरू झाली आहे. मंजूर झालेल्या दुरुस्त्यांना अनुसरून सुरक्षा समितीवरील सभासदांची संख्या ११ ऐवजी १५ करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे आर्थिक व सामाजिक समितीच्या सभासदांची संख्या १८ ऐवजी २७ करण्यात आली आहे. सुरक्षा समितीत ब्रिटन, अमेरिका, रशिया, फ्रान्स व चीन हे कायमचे सभासद आहेत. समितीपुढे आलेल्या प्रश्नांवर निर्णय घेण्यासाठी आतापर्यंत ७ मतांची आवश्यकता असे. आता ९ मतांची आवश्यकता आहे. दोन्ही समित्यांवरील वाढविलेल्या जागा भरण्यासाठी आणि नियमाप्रमाणे रिकाम्या होणाऱ्या जागा भरण्यासाठी रीतसर निवडणूक करण्यात येईल. सुरक्षा समितीमधील १० फिरत्या जागांपैकी ५ जागा आशिया व आफ्रिका खंडांतील देशांना देण्यात येतील, २ दक्षिण अमेरिकेतील देशांना देण्यात येतील आणि २ पश्चिम युरोपातील देशांना देण्यात येतील. एक जागा पूर्वयुरोपातील देशांना मिळेल. आर्थिक व सामाजिक समितीवरील वाढविलेल्या जागांपैकी ७ आफ्रिका व आशिया खंडातील देशांना, १ दक्षिण अमेरिकेतील देशांना व १ पश्चिम युरोप व इतर देशांना मिळेल.

### उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्याची योजना

राज्यातील उद्योगधंदे व व्यापारव्यवसाय ह्यांना उत्तेजन देण्यासाठी मद्रास सरकारने चेंबर्स ऑफ कॉमर्सच्या सहकार्याने एक योजना तयार केली आहे. राज्यातर्फे देण्यात यावयाच्या बक्षिसासाठी व प्रशस्तिपत्रासाठी एक बक्षिसमंडळ स्थापन करण्यात आले आहे. त्यात सरकारी अधिकारी व बिनसरकारी लोक राहतील. बक्षिसमंडळाचे अध्यक्षपद मद्रासच्या मेयरकडे राहील. हे मंडळ राज्यातील विविध उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यासाठी बक्षिसे, प्रशस्तिपत्रे, पदके अगर इतर मानाची चिन्हे बहाल करणार आहे. बक्षिसे, प्रशस्तिपत्रे, अगर पदके एखाद्या वर्षासाठी अगर एकापेक्षा आधिक वर्षांसाठी, संबंध राज्यासाठी अगर त्यातील एखाद्या विशिष्ट भागासाठी देण्यात येतील. प्रारंभ म्हणून मद्रास राज्यातून १९६५ च्या करआकारणीच्या वर्षात जास्तीत जास्त निर्यात करणाऱ्या व्यापारी संघटनेला बक्षीस देण्यात येणार आहे.

### कंपन्यांचे दिल्लीतील अधिकृत प्रतिनिधी

मध्यवर्ती सरकारच्या निरनिराळ्या खात्यांतील अधिकाऱ्यांना भेटून आपली कामे करून घेण्यासाठी बहुतेक व्यापारी कंपन्या आपले प्रतिनिधी दिल्ली येथे ठेवतात. ह्या पद्धतीचा दुरुपयोग करण्यात येतो अगर होतो, असे आढळून आल्याने सरकारने नेमलेल्या संतानम कमिटीने काही शिफारशी केल्या होत्या. त्या मान्य करून प्रत्येक कंपनीला काही किमान प्रतिनिधीच ठेवता येतील असे ठरविण्यात आले आहे. एखाद्या कंपनीला एकापेक्षा आधिक प्रतिनिधी ठेवावयाचे असल्यास त्यासाठी खास परवानगी काढावी लागेल. प्रतिनिधीसाठी एखाद्या सरकारी खात्याची मान्यता मिळविण्यापूर्वी कंपनीने दुसऱ्या कोठल्याही खात्याकडे अशी मान्यता घेण्यासाठी अर्ज केलेला नाही, असे जाहीर करावे लागेल. तथापि कंपनीच्या मालकाने, मॅनेजरने अगर स्थानिक डायरेक्टराने सरकारी अधिकाऱ्यांना भेटण्याच्या बाबतीत काहीही निर्बंध घालण्यात आलेले नाहीत.

### शस्त्रक्रियेच्या उपकरणांचा कारखाना

मद्रास राज्यात रशियाच्या मदतीने काढण्यात आलेल्या शस्त्रक्रियेच्या उपकरणांच्या कारखान्याचे उद्घाटन नुकतेच करण्यात आले. भारताला दरसाल ७१ लाख रुपये किंमतीच्या शस्त्रक्रियेची हत्यारे आयात करावी लागतात. परंतु ह्या कारखान्यामुळे आता ती आयात करावी लागणार नाहीत. कारखाना रशिआच्या तांत्रिक सहकार्याने उभारण्यात आला असून त्यासाठी ५.२५ कोटी रुपये खर्च आला आहे. ह्या कारखान्यांतून निरनिराळ्या प्रकारची १६६ हत्यारे दरसाल तयार करण्यात येतील. त्यांची किंमत सुमारे २.७ कोटी रुपये होईल. कारखान्याला आलेल्या खर्चापैकी १.६ कोटी रुपयांची रक्कम त्यात काम करणारांसाठी घरे, वैद्यकीय मदत व इतर सोयी मिळवून देण्यासाठी खर्च करण्यात आली आहे.

**शैक्षणिक पुस्तकांचे प्रकाशन**—शाळाकॉलेजातील अभ्यासक्रमांची पुस्तके चोरून छापली गेल्याचे प्रकार उघडकीस आलेले आहेत. हे प्रकार थांबविण्यासाठी अशा पुस्तकांचे प्रकाशन करणारे कॉर्पोरेशन बिहारमध्ये स्थापन करण्यात येणार आहे. कॉर्पोरेशनचे भांडवल १·५ कोटी रुपयांचे असेल व त्यातील ६० टक्के भांडवल राज्यसरकारच्या मालकीचे असेल. उरलेले भांडवल ह्या धंद्यातील अनुभवी प्रकाशकांकडून जमविण्यात येईल. कॉर्पोरेशन स्वतःच्या मालकीचा छापखाना काढणार आहे.

**देणग्या स्वीकारण्यापूर्वी सरकारला कळवा**—हिंद सरकारच्या परराष्ट्रखात्यानें राज्यसरकारांना एक पत्रक पाठवून असें कळविलें आहे, की कोणत्याहि परदेशी सरकारकडून देणगी स्वीकारण्यापूर्वी मध्यवर्ती सरकारची आगाऊ मंजुरी घेण्यांत आली पाहिजे. अशी मंजुरी घेतल्याशिवाय परदेशांकडून देणग्या स्वीकारणें नियमांना सोडून आहे, असें मत खात्यानें व्यक्त केलें आहे. अशा देणग्या स्वीकारल्यांची कांहीं उदाहरणें खात्याच्या नजरेला आलेलीं आहेत.

**निग्रो मतदारांची वाढती संख्या**—अमेरिकेंत निग्रो लोकांना राज्यघटनेप्रमाणें समान हक्क असले तरी मतदानाचे हक्क बजावण्याच्या कामीं अडचणी आहेत. दक्षिणेकडील कांहीं घटकराज्यांतून साक्षरतेची अट घालण्यांत येते. कांहीं राज्यांतून तर अमेरिकन राज्यघटना मुखोद्गत असणाऱ्या निग्रोंचीच मतदार म्हणून नोंद होऊं शकते. अध्यक्ष जॉन्सन ह्यांनीं मतदानाच्या हक्कांतील भेदभाव नाहींसे करण्यासाठी अलीकडे कायदा मंजूर करून घेतला आहे. त्याचा फायदा घेऊन गेल्या महिन्यांत २० हजार नव्या निग्रो मतदारांची नोंद करण्यांत आली आहे. अमेरिकेंतील लोकसंख्येंत सुमारें एकदशांश निग्रो आहेत.

**निर्यात व्यापाराची हालहवाल**—चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहींत म्हणजे एप्रिलपासून जूनअखेरपर्यंत भारतामधून सुमारें १८५·३५ कोटी रुपये किमतीचा माल निर्यात करण्यांत आली. गेल्या वर्षाच्या ह्यांच काळांतील निर्यातीशी तुलना करतां ही निर्यात १·०६ कोटी रुपये किमतीनें कमी आहे. जून महिन्यांत ६७·२२ कोटी रुपयांचा माल निर्यात करण्यांत आला. १९६४ च्या जूनमध्यें ६९·१८ कोटी रुपयांचा माल निर्यात करण्यांत आला होता.

**एकाच फुप्फुसाने श्वास करणारे लोक**—अहमदाबादमधील एका शस्त्रवैद्याने अशी माहिती सांगितली आहे की शहरांत एकाच फुप्फुसाने श्वासोछ्वास करणारे ८०० लोक आहेत. फुप्फुसातील विकृतीमुळे त्यांचे एक फुप्फूस काढून टाकण्यात आलेले आहे. अहमदाबाद शहरात क्षयरोग आणि फुप्फुसाचा कॅन्सर ह्या रोगांनी पछाडलेल्या लोकांची संख्या वाढत चालली आहे. शहरातील उद्योगधंद्यात झालेली वाढ आणि धूम्रपानाचे वाढते व्यसन ही त्याची कारणे आहेत. शहरांतील क्षयरोग्यांची संख्या २५ ते ३० हजारांपर्यंत पोचली आहे.


भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!

सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. १०·११ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. १५·७८ ,, |
| ठेवी | ... | रु. ४४३·६२ ,, |
| खेळतें भांडवल | ... | रु. ४८१·१५ ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.




महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.
मुंबई
( दि विदर्भ सहकारी बँक लि., सम्मीलित )

: मुख्य कचेरी :
९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई
टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४ २५४७८१

: विभागीय कचेरी :
महाल : नागपूर.
तारेचा पत्ता : फार्मर बँक

: बृहन्मुंबईतील शाखा :
( १ ) भायखळा ( २ ) गोरेगांव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्लें ( ७ ) सांताक्रूझ ( ८ ) मुलुंड ( ९ ) चेंबूर ( १० ) माहीम ( ११ ) शीव ( १२ ) माटुंगा ( १३ ) अंधेरी.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग, सहकारी लहान उद्योगधंदे व सहकारी साखरकारखाने यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ५,३०,५१,००० |
| गंगाजळी व फंड | ... | १,५६,७५,००० |
| ठेवी | ... | ३९,१४,३१,००० |
| खेळतें भांडवल | ... | ९१,४८,३५,००० |

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

डॉ. वा. चु. श्रीश्रीमाळ, मॅनेजर. श्री. वि. म. जोगळेकर, जनरल मॅनेजर.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## दि महाबळेश्वर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि.

महाबळेश्वर नगरवासीयांना स्वस्त व्याजाचे दराने कर्ज पुरवठा करण्याच्या हेतूने प्रेरित होऊन, दि महाबळेश्वर अर्बन को-आपरेटिव्ह केडिट सो. लि. या नावाने या संस्थेची तारीख १।४।१९३५ रोजी स्थापना करण्यात आली. तारीख २२।४।१९६० रोजी संस्थेचे बँकेत रूपांतर करण्यात आले. त्याच वर्षी सोसायटीस २५ वर्षे पूर्ण झाल्याने, रौप्य महोत्सव व बँकेत रूपांतर झाल्याने, बँकेचे उद्‌घाटन असा समारंभ तारीख २५-५-१९६० रोजी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल श्री. श्रीप्रकाश यांचे शुभ हस्ते मोठ्या उत्साहाने पार पडला.

गेल्या सहा वर्षांत बँकेची कसकशी प्रगती झाली हे सोबतच्या तक्त्यावरून समजून येईल.

बँकेचे सध्याचे संचालकमंडळ खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| श्री. डी. ए. शेटे | चेअरमन |
| ,, पी. व्ही. वागदरे | डायरेक्टर |
| ,, आर. एस. इराणी | ,, |
| ,, एच. जी. सिकंदर | ,, |
| ,, डी. एम. माळवदे | ,, |
| ,, जी. एस. यादव | ,, |
| ,, ए. व्ही. भिसे | ,, |
| ,, बी. आर घोत्रे | आ. सेक्रेटरी |
| ,, व्ही. पी. खुरासणे | मॅनेजर |

३०-६-६० अखेर बँकेची सभासदसंख्या ४२५ होती, ती ३०-६-६५ अखेर ८९४ झाली आहे. शेअर भांडवल २१,१६० रु. चे ७६,५७० रु. झाले. रिझर्व्ह व इतर फंड ५,१०६ रु. वरून १६,००४ रु. वर गेले असून ठेवींतील प्रगती ६३,८४२ रु. वरून ३,०७,७९६ रु. वर गेली आहे. परिणामतः खेळते भांडवल ९३,३८४ रु. चे ४,२३,१०२ रु. झाले. एकूण उलाढाल अशीच वाढत जाऊन ती १० लक्ष रु. वरून ९० लाखांवर गेली आहे. नफ्याचा आकडा १,५५७ रु. वरून ११,६४४ रु. वर गेला आहे. ऑडिट वर्ग गेली सहा वर्षे 'अ' कायम आहे.

[ चेअरमन : श्री. डी. ए. शेटे; ऑ. सेक्रेटरी : श्री. बी. आर. घोत्रे; मॅनेजर : श्री. व्ही. पी. खुरासणे .]

## अर्बन को. बँक लि. सांगली

अहवालाचे वर्षी भाग भांडवल २८,०२० रु. नी वाढून ते ३,००,६१० रु. झाले. सर्व प्रकारच्या राखीव निधीत ५५,४६९ रु. ची भर पडून ते ६,६९,२३९ रु. चे झाले. ठेवी ७ लक्ष रु. नी वाढून त्यांची रक्कम ७८ लाखांवर गेली. कर्जव्यवहारात १० लाखांची वाढ झाली. ७-२-१९६५ रोजी बँकेची खण भाग शाखा सुरू झाली. सदर शाखेकडे वर्षअखेर १,२४,५९० रु. च्या ठेवी आहेत. गावभाग शाखा लवकरच सुरू होईल. बुधगाव शाखेसाठीही परवानगी मागितलेली आहे. प्रतिवृत्ताचे साली निव्वळ नफा ८१,७५४ रु. झाला.

[ चेअरमन : श्री. ग. का. दांडेकर, मॅनेजर : श्री. ल. य. लागू ]

## ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडूंचा अलावन्स

येत्या ऑस्ट्रेलिया-इंग्लंड क्रिकेट कसोटी सामन्यांचे वेळी प्रत्येक ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटूला प्रत्येक सामन्यासाठी ८० ऑस्ट्रेलियन पौंड अलावन्स मिळणार आहे. प्रत्येक सामन्यासाठी अवांतर खर्चाकरिता १५ पौंड दिले जातील, ते वेगळेच. म्हणजे पाच कसोटी सामन्यांकरिता मिळून प्रत्येक खेळाडूला ४७५ ऑस्ट्रेलियन पौंड ( सुमारे ५,००० रु. ) मिळतील.

## दि पूना मर्चंट्स को. बँक लि.

खपलेले भांडवल जरी ४,९०,४०० रु. आहे, तरी भागावरील सर्व हप्ते मागविलेले नसल्यामुळे वसूल भांडवल २,९९,८०७ रु. आहे. पोटनियमाप्रमाणे प्रथमतःच कर्ज घेणाऱ्या सभासदास १०% रक्कम भाग खाती भरणा करावी लागते. भाग शिल्लक नसल्याने अशी रक्कम शेअर सस्पेन्स खात्यावर घेण्यात आली आहे. ही रक्कम ९३,६८० रु. जमा आहे. त्यावर डिव्हिडंडच्या दराने लाभांश देण्यात येईल. "ह्या वर्षीही सभासदांनी कर्जफेडीबाबत दाखविलेला वक्तशीरपणा प्रशंसनीय आहे. बँकेचे फंड्स ३,२८,९४८ रु. चे असून ठेवीची रक्कम २५½ लक्ष रु. आहे. बँकेस ३०-६-६५ अखेरच्या वर्षी ४१,७४८ रु. नफा झाला.

[ चेअरमनः श्री. सु. स. जगताप, एम. ए., जी. डी. आर्ट., व्हाइस चेअरमनः श्री. बा. दु. सपार, ऑ. एजंटः श्री. म. सा. शेळके; एजंटः भ. ग. साबणे ]

## भारताच्या लष्करी कारवाईचे परिणाम

पाकिस्तानने अमेरिकन शस्त्रास्त्रांचा वापर करून काश्मीरवर लष्करी ताबा मिळविण्याचे प्रयत्न चालू ठेवले, तर भारतही आपल्या सोयीप्रमाणे पाकिस्तानवर चाल करील असा इषारा भारताने अमेरिकेला काही दिवसांपूर्वी दिला होता. अमेरिकेने पाकिस्तानला आवरावे अशी भारताची अपेक्षा होती. पण ती सफल झाली नाही. म्हणून भारताने जेव्हा लाहोरच्या दिशेने लष्करी मोहीम सुरू केली तेव्हा अमेरिकेला फारसे आश्चर्य वाटले नाही. तरीसुद्धा अमेरिकेच्या काही अधिकाऱ्यांनी खाजगी रीत्या भारताला अशी धमकी दिली की, शस्त्रसंधीरेषेवरून भारताने केलेले हल्ले आणि आंतरराष्ट्रीय सरहद्दीवरून केलेले हल्ले ह्यांच्यांत फरक आहे. भारताने आंतरराष्ट्रीय सरहद्दीवरून केलेल्या हल्ल्यामुळे त्याला आक्रमक ठरविता येण्याची शक्यताही ह्या अधिकाऱ्यांनी ध्वनित केली होती.

## कापसाचे उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न

देशातील कापसाचे उत्पादन वाढविण्याच्या सरकारच्या प्रयत्नात आपण होऊन साह्य करण्याचे इंडिअन कॉटन मिल्स फेडरेशन ह्या संघटनेने ठरविले आहे. कापसाचे उत्पादन करणाऱ्या १० विभागांची निवड करून त्यामधील कापूस उत्पादनाचा विकास घडवून आणण्यासाठी फेडरेशनतर्फे ह्या वर्षी १४·५ लाख रुपये खर्च करण्यात येणार आहेत. भारतामधील कापड गिरण्यांना लांब धागा निघणारा कापूस परदेशांतून मोठ्या प्रमाणावर आयात करावा लागतो, आणि त्याच्या आयातीसाठी दरसाल ५० ते ६० कोटी रुपयांचे परदेशीय चलन खर्च करावे लागते. सध्याच्या परदेशीय चलनाच्या टंचाईच्या काळांत तर एवढी मोठी रक्कम खर्च करणे परवडणारे नाही. फेडरेशन परदेशी कापसाची आपली मागणी कमी करणार आहे. कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना कापूसमशागतीच्या आधुनिक पद्धतींचा वापर करण्यास उत्तेजन देऊन, लांब धाग्याचा कापूस पिकविता येईल अशी अपेक्षा आहे.

## वॉर रिस्क इन्शुअरन्सचे हप्ते वाढले

पाकिस्तानी आक्रमणामुळे युद्धधोक्याच्या विम्याचे दर वाढविण्यात आले आहेत. मालाला आणि कारखान्याला दर शंभर रुपयांस अनुक्रमे १० पैसे व १५ पैसे असे ते दर राहतील. चालू तिमाहीचे हप्ते सप्टेंबरपुरतेच किंवा तिमाही हप्त्यांच्या एक तृतीयांशाइतके द्यावे लागतील; शेवटची तारीख १५ सप्टेंबर आहे.

## भारतातील कारखान्यांची कमी प्रतीची उत्पादनक्षमता

पश्चिमेच्या मानाने भारतातील उत्पादनक्षमता अगदीच कमी प्रतीची आहे. पाश्चिमात्य देशात कामगाराची जी उत्पादनक्षमता आहे तिच्या एकपंचमांश क्षमता भारत व आशियायी राष्ट्रे यांमध्ये दिसून येते, याला अपवाद फक्त जपानचा सापडेल.

ढोर मेहनत अथवा कामाचे अधिक तास यामुळे उत्पादन-वाढीची समस्या सुटणार नाही. अर्थात आजच्या परिस्थितीतील वरील दोन गोष्टींचे महत्त्वही कमी लेखून चालणार नाही. पण कामगार, यंत्रे व कच्चा माल यांचा जास्तीत जास्त उपयोग करून उत्पादन मिळविणे याची आज अगत्याने आवश्यकता आहे. काही निवडक उद्योगांतील उत्पादनक्षमतेचे तौलनिक आकडे पुढे देत आहो :—

साखरव्यवसाय

| देश | एक टन उत्पादनाला लागणारे कामगार तास. |
|---|---|
| फिलिपाइन्स ... ... | १६–८३ |
| हवाई ( यु. एस. ए. ) ... | ४–६५ |
| प्युएर्टो रिको ... ... | ५–१० |
| लुईसीनिया ( यु. एस. ए. ) ... | ७–८७ |
| भारत ... ... | ८४–४० |

सिमेंट कारखाने

| | |
|---|---|
| अमेरिका ( यु. एस. ए. ) ... | १–५० |
| बेल्जम ... ... | १–५१ |
| जपान ... ... | १–७५ |
| ब्रिटन ... ... | १–८२ |
| जर्मनी ... ... | २–२० |
| भारत ... ... | १०–१५ |

गव्हाची शेती

| | (एकरी उत्पादन टनात) |
|---|---|
| ब्रिटन ... ... | १–४५ |
| जर्मनी ... ... | १–४४ |
| स्वित्सर्लंड ... ... | १–४० |
| न्यूझीलंड ... ... | १–३६ |
| भारत ... ... | ०–३२ |

## अमेरिकेच्या आकाशवीरांचा प्रवास

जेमिनी ५ ह्या अमेरिकेच्या अवकाशयानातून दोन प्रवासी धाडण्यात आले होते. त्यांनी पृथ्वीभोवती १२० फेऱ्या मारून नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. ह्यापूर्वी रशियन अंतराळ-वीरांनी ८१ फेऱ्या मारलेल्या होत्या. पृथ्वीवरून चंद्रापर्यंत व तेथून परत पृथ्वीवर येण्यास जितके अंतर कापावे लागेल तेवढे अमेरिकन प्रवाश्यांनी कापले. ह्या प्रवाश्यांच्या प्रकृतीवर कसलाही अनिष्ट परिणाम झाल्याचे आढळून आले नाही. त्यामुळे पृथ्वी ते चंद्र व परत, असा प्रवास करणे शारीरिकदृष्ट्या अशक्य नाही असे सिद्ध झाले आहे. अंतराळयानाच्या उड्डाणासाठी वापरण्यात आलेले जळण आकारमानाने व वजनाने नेहमींच्या जळणापेक्षा हलके होते. अवकाशयानातून घेण्यात आलेल्या छायाचित्रावरून पृथ्वीवरील लहानसहान गोष्टीसुद्धा अचूक टिपण्यात आल्या होत्या. तेव्हा लष्करी दृष्टीने महत्त्वाच्या गोष्टींचे छायाचित्रण स्पष्टपणे करता येईल हे उघडच झाले.

## दिल्लीत ५० पाश्चात्त्य पत्रकार

भारत–पाकिस्तान लढ्याची माहिती वृत्तपत्रांना पुरविण्या-साठी ५० पाश्चात्त्य पत्रकार दिल्लीमध्ये दाखल झाले आहेत.

## उत्तरप्रदेशांतील आण्विक वीजकेंद्राची उभारणी

उत्तरप्रदेशात ओब्रा ह्या ठिकाणी उभारण्यात येत असलेल्या वीजकेंद्राची बांधणी झपाट्याने करण्यात येत आहे. वीज-उत्पादनाच्या पहिल्या यांत्रिक गटाची उभारणी येत्या चार महिन्यांत पुरी करण्यात येऊन ५० मेगॅवॅट विजेचे उत्पादन होऊ लागेल. म्हणजे ठरलेल्या तारखेपेक्षा उभारणीचे काम ६ महिने लवकर उरकण्यात येईल. ह्या केंद्राच्या उभारणीचा पहिला टप्पा १९६६ च्या अखेरीस पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर २५० मेगॅवॅट विजेचे उत्पादन होऊ लागेल. केंद्राच्या उभारणसाठी एकूण २७ कोटी रुपये खर्च येणार आहे. रशियाच्या मदतीने उभारण्यात येणाऱ्या ह्या केंद्रातून मोगलसराई आणि कानपूर भागाला विजेचा पुरवठा करण्यात येईल. केंद्रासाठी लागणारी सर्व यंत्रसामग्री रशियाकडून पुरविण्यात येत असून त्यापैकी बहुतेक केंद्राच्या जागेवर येऊन पोचली आहे. केंद्राचा दुसरा टप्पा पूर्ण झाल्यावर एकूण ४०० मेगॅवॅट विजेचे उत्पादन होऊ लागेल.

**पाकिस्तान-जपान व्यापार**—कराचीमधील जपानी वकिलाती कडून टोकिओला आलेल्या माहितीप्रमाणे पाकिस्तानने परदेशांची देणी देण्याचे बंद केलेले आहे. परदेशीय चलनाच्या टंचाईमुळे असे करणे पाकिस्तानला भाग पडले. गेल्या वर्षी जपानने पाकिस्तानला ८ कोटी डॉलर्स किमतीचा माल निर्यात केला. प्राप्त परिस्थितीत जपानला पाकिस्तानबरोबरचा आपला व्यापार काही दिवस तरी स्थगित करावा लागणार आहे.

**किनाऱ्यावरील बोटींची तपासणी**—मद्रास राज्यातील येणाऱ्या सर्व परदेशीय बोटींची पोलिसांकडून तपासणी करण्यात यावी असा हुकूम त्या राज्य सरकारने काढला आहे. पाकिस्तानचे हस्तक चोरट्या रीतीने भारताच्या हद्दीत येऊ नयेत म्हणून ही खबरदारी घेण्यात येत आहे. मद्रासमध्ये एका पाकिस्तानी हस्तकाला अटक करण्यात आली. त्याच्याजवळ काही बंदुका आणि शहरातील लष्करी महत्त्वाच्या ठिकाणांचे नकाशे सापडले.

**अमेरिकेच्या शस्त्रागारांत भर**—अमेरिकन लष्करासाठी रणांगणावर वापरता येईल अशा प्रकारचे एक नवे अणुशस्त्र बन-विण्यात येत आहे. ह्या शस्त्राबद्दलचा तपशील अद्याप बाहेर पडलेला नाही. तथापि, अमेरिकन सिनेटच्या शस्त्रास्त्रसमितीत अलीकडे त्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. ह्या नव्या शस्त्रा-मधून नेहमीचा दारुगोळाही उडविता येईल. प्रत्यक्ष युद्धक्षेत्रात वापरता येण्यासारखी अनेक अण्वस्त्रे अमेरिकेजवळ आहेत. त्यात आता आणखी एकाची भर पडत आहे.

**शस्त्रास्त्रे परत करण्याची मागणी**—१९६२ साली चीनने भारतावर हल्ला केला त्या वेळी ब्रिटनने भारताला काही शस्त्र-सामग्री उधार-उसनवारीने दिली होती. ५ ऑगस्टपासून चालू झालेल्या पाकिस्तान–भारत संघर्षात भारताने त्यांचा वापर केला असल्यास ती परत करण्यात यावीत, अशी मागणी ब्रिटन कर-णार आहे. तथापि ही शस्त्रास्त्रे फारशी नसल्यामुळे ती परत केली तरी भारताच्या युद्धसामर्थ्यावर फारसा परिणाम होणार नाही.

हें पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले